# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०५/२०१८

**१) टिप्पर ने ट्रॅव्हल्सला धडक देवुन नुकसान करून १८ प्रवाशांना जखमी केल्याने गुन्हा नोंदः--**

दिनांक ०७/०५/२०१८ चे ०२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सागर रामराव बोदरे वय २५ रा. संजय गाधी नगर रोड नागपुर त्याचे ताब्यातील टिप्पर क्र. एमएच ४०/ एके ६२८५ हे वाहन अतिशय वेगाने व हयगयीने चालवुन ट्रॅव्हल्स क्र. ४९/१०५६ ने कंडक्टर साईडला समोरुन धडक दिल्याने ड्रायव्हरचे समोरील इंजीनचा भाग गॅस बोर्ड रिडीयेंटर पुर्णपने तुटल्याने अंदाजे ५०,०००/--रु. चे नुकसान झाल्याने व ट्रॅव्हल्स मधील बसलेले १८ प्रवासी जखमी झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७,४२७ भादवी. सहकलम १३४/ १८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहनाने ईलेक्ट्रीक पोलला धडक देवुन तार तुटुन महावितरण कंपनीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक ०६/०५/२०१८ चे ०१.३० वाजता दरम्यान यातील टोलनाका कारधा येथील ईलेक्ट्रीक पोलला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने पोल तुटुन तार तुटल्याने ईलेक्ट्रीक लाईन बंद झाल्याने महावितरण कंपनीचे अंदाजे ३०,०००/--रु. नुकसान झाले आहे. अश्या फिर्यादी मयंक कौशलेंद्र सिग वय २४ वर्ष, रा. सहाय्यक अभियंता धारगाव यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या टंकीमधुन पेट्रोल काढण्याचे चोरीचे प्रयत्न करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक ०६/०५/२०१८ चे २३.०० ते २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दादुराम ग्यानीराम वाघमारे वय ४९ वर्ष, रा. श्रीराम नगर तुमसर याची हिरो होंन्डा स्प्लेन्डर मोटार सायकल क्र. एमएच ३६/ पी २७३१ घरा बाहेर उभी ठेवली असता कोणीतरी अज्ञात इसम हा मोटार सायकलचे टंकीमधुन पेट्रोल काढण्याचे चोरीचे प्रयत्न करतांना दिसुन आल्याने पाहुन पळुन गेला असे फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,५११ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलच्या धडकेत महिला गंभिर जखमी :--**

दिनांक २३/०४/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन यातील जखमी श्रीमती कलाबाई प्रभाकर मेश्राम वय ५० वर्ष रा. कारधा हिला मागेहुन धडक दिल्याने, तिचे डाव्या पायाला व डावे हाताला व डोक्याला मार लागुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मनघटे यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) खोटे दस्ताऐवज तयार करून फसवणुक केल्याने गुन्हा नोंदः--**

दिनांक ०१/०४/२०११ ते दि. १७/०१/२०१८ पर्यत दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीने मृत आईचे ठिकाणी आरोपी क्र. ३ हीस हजर करून हीच स्त्री होय असे भासवुन गट क्र. १८७ आराजी ०.४२ मधील शेतीची रजिस्ट्री करून फसवणुक केली व खोटे दस्ताएवज तयार करून बनावट करून शेतीची रजिस्टरी केल्याने फिर्यादी सुरज दिपक कुंभारे वय २० वर्ष रा. भांडे प्लॉट उमरेड रोड नागपुर तर्फे पोहवा. नंदेश्वर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४०४,४१७, ४२०,४६७,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**६) अल्पवयीन मुले मदीरा उदयोग बारमध्ये काम करीत असतांनी मिळुन गुन्हा नोंदः--**

दिनांक ०७/०५/२०१८ चे १३.४५ दरम्यान यातील फिर्यादी उज्वल सुभाषचंद्र लोया सरकारी कामगार अधीकारी भंडारा यांनी जिल्हा बाल कमगार विरोधी कृतीदला मार्फत डिलक्स बार परसोडी येथे धाड टाकली असता, बार मध्ये बालकामगार १) हृतीक दिनेश गाहने वय १७ वर्ष २) सोनु परमांनद पुसतोडे वय १७ वर्ष ३) सुभाष मनसुकलाल खांडगे वय १६ वर्ष हे काम करीत असतांनी मिळुन आले शासन निर्णय श्रम व रोजगार मंत्रालय यांचे अधीसुचने प्रमाणे १८ वर्षा खालील मुलांना मदीरा उदयोग बार मध्ये कामाला लावने प्रतिबंधक असल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २४,७९ बाल न्याय मुलाची काळजी व संरक्षण अधी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.